**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ३० जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रपिता महात्मा गांधी तसंच देशासाठी बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांना आज देशाची आदरांजली.**
2. **अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीनं, सहकार्य करण्याचं सरकारचं आवाहन.**
3. **'अमृतकाल: विकसीत भारत-2047' या तीन दिवसीय गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेचं, 1, 2 आणि 8 फेब्रुवारी दरम्यान आयोजन एक फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार, अर्थसंकल्पाचं विश्लेषण.**
   **आणि**
4. **३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये, पदक तालिकेत कर्नाटक अग्रस्थानी तर १२ पदकांसह, महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर.**

**आता सविस्तर बातम्या** …….

**महात्मा गांधी पुण्यतिथी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी आज शहीद दिन म्हणून पाळण्यात येत आहे. देशभरातून महात्मा गांधींना तसंच देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली जात आहे. नवी दिल्लीत राजघाट या महात्मा गांधीच्या समाधीस्थळी प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, तिनही सेना दलांचे प्रमुख यांनी राजघाट इथं महात्मा गांधीना आदरांजली अर्पण केली. पंतप्रधान मोदी यांनी गांधीना सामाजिक संदेशाच्या माध्यमातून अभिवादन केलं. गांधीजींचे आदर्श देशवासियांना विकसित भारत निर्माण करण्यासाठी प्रेरणा देतात असं, त्यांनी म्हटलं आहे. शहीद दिनानिमित्त, पंतप्रधानांनी, देशासाठी आपल्या प्राणांचं बलिदान दिलेल्या शूर वीरांना यावेळी आदरांजली अर्पण केली आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त दक्षिण मुंबईतल्या, महात्मा गांधी स्मारक असलेल्या, 'मणिभवन'ला भेट दिली. यावेळी त्यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली आणि प्रार्थना सभेत सहभाग घेतला. यावेळी बोलताना त्यांनी, सर्वांना जात, पंथ आणि धर्म यांच्या मतभेदापलीकडे जाण्याचं आवाहन केलं. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि सदाचाराच्या विचारांचं

पालन करावं असं, ते म्हणाले. आकाशवाणी नागपूरच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही आज हुतात्मा दिनानिमित्त, महात्मा गांधी तसंच देशासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. महावितरणतर्फ़े देखील दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. दरम्यान, वर्धा इथल्या महात्मा गांधी विश्व विद्यालयात पुण्यतिथी निमित्त भजनांचा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

**सर्वपक्षीय बैठक**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू तसंच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, गौरव गोगोई, तृणमूलचे सुदीप बंदोपाध्याय, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव, बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा आणि द्रमुकचे टी.आर.बालू यांच्यासह विविध पक्षांचे खासदार त्यात सहभागी झाले होते. बैठकीला ३६ विविध पक्षांचे मिळून ५२ खासदार उपस्थित होते असं, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीनं सहकार्याचं आवाहन यावेळी सरकारतर्फे करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं उद्या अधिवेशनाची सुरुवात होणार असून, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या शनिवारी अर्थसंकल्प सादर करतील. सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणा बद्दलच्या आभार प्रस्तावावर, दोन्ही सभागृहात चर्चा होईल.

**अर्थसंकल्प अपेक्षा**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या शनिवारी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतील. या अर्थसंकल्पातून कुठल्या घटकासाठी काय काय तरतूद केली जाईल याबद्दल, नागरिकांमधे चर्चा सुरू आहे. तसंच याकडून अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. नागपूरचे ज्येष्ठ माजी अर्थशास्त्राचे शिक्षक, माधव भोंडगे यांनी बजेट कडून त्यांच्या अपेक्षा आकाशवाणी सोबत सामायिक केल्या......

**(होल्ड बाईट - 34 सेकंद)**

***आगामी अर्थसंकल्पाकडून शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी अधिक प्रावधान करण्यात यावे अशी माझी अपेक्षा आहे. याशिवाय गरजू आणि गरीब मुलांना अधिकाधिक प्रमाणात शिक्षण घेता यावं, तसंच शैक्षणिक व्यापकता वाढावी यासाठी सरकारने शिक्षण क्षेत्रासाठी अधिक तरतूद करावी जेणेकरून शिक्षण खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक होऊ शकेल अशी एक माजी शिक्षक म्हणून माझी अपेक्षा आहे.***

***याशिवाय सर्वसामान्यांचे जीवन सुकर करण्यासाठी दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील कर कमी करावा ही देखील या अर्थसंकल्पाकडून माझी अपेक्षा आहे.***

**मराठी साहित्य संमेलन**

नवी दिल्लीत मराठी साहित्य संमेलन होणं ही मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नवी दिल्ली इथल्या कार्यालयाचं उद्घाटन, फडणवीस यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच देशाच्या राजधानीत हे भव्य संमेलन होत असून, ते यशस्वी व्हावं अशा शुभेच्छाही फडणवीस, यांनी दिल्या.

**अमृतकाल:विकसीत भारत-2047'**

आर्थिक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात कार्य करणा-या मनी बी इन्स्टिट्यूट प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीनं, 'अमृतकाल:विकसीत भारत-2047' या तीन दिवसीय गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेचं 1, 2 आणि 8 फेब्रुवारी दरम्यान, आयोजन करण्यात आलं आहे. एक फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला जाणार असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याच विश्लेषण करतील अशी माहिती, मनी बीच्या संचालिका, शिवानी दाणी-वखरे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यावर्षीच्या परिषदेचं उद्घाटन एक फेब्रुवारी रोजी, सायंटिफीक सोसायटी लॉन, लक्ष्मीनगर इथं सायंकाळी साडेसहा वाजता, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला केडिया सिक्युरिटीजचं व्यवस्थापकीय संचालक विजय केडिया एन.एस.ई.चं चिफ बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर श्रीराम कृष्णन यांची उपस्थिती राहील. दोन फेब्रुवारी रोजी, सायंकाळी साडेसहा वाजता केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री, पियुष गोयल, मॉर्गन स्टॅनली इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, रिधम देसाई आणि व्हेंचर कॅटॅलिस्ट ग्रुपचे सह-संस्थापक, अपूर्व शर्मा यांचे भारतीय अर्थशास्त्र, गुंतवणूक, शेअर बाजार आणि संपत्ती निर्मिती या विषयांवर, मार्गदर्शन लाभणार आहे. आठ फेब्रुवारी रोजी, सायंकाळी साडेसहा वाजता या परिषदेचा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते समारोप होणार आहे. या कार्यक्रमाला उद्योगपती रमेश दमाणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**ॲग्रिस्टॅक योजना**

शासनाच्या विविध कृषी संलग्न योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलदगतीनं आणि अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत, शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक दिला जात आहे. गडचिरोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी, लवकरात लवकर नजीकच्या नागरी सुविधा केंद्रावर नोंदणी करून

शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करण्याचं आवाहन, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी केलं आहे.

***(होल्ड बाईट ३४ सेकंद)***

***याच्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांच्या एक फार्मर आयडी व शेतकरी ओळखपत्र तयार करण्यात येईल पूर्ण गडचिरोली जिल्ह्यात आपले एक लाख अठ्यात्तर हजार शेतकऱ्यांपैकी साडेचौदा हजार शेतकऱ्यांच्या ऑलरेडी याच्यामध्ये ओळखपत्र तयार करण्यात आलेली आहे. याच्यामध्ये जे जे पिक विमा, पिक कर्ज, पीएम किसान चा लाभ हे सगळं आता लाभ मिळाला. खूप याच्यामध्ये सुलभता होईल. कारण एकच रजिस्ट्रेशन जे होईल त्याच्यामध्ये एक आयडी मध्ये सगळे काही माहिती तिथे संकलन होणार आणि तुम्हाला लवकरात लवकर त्याच्यामध्ये लाभ मिळणार.***

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

उत्तराखंडमधे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत कर्नाटक पदक तालिकेत आघाडीवर असून, मणिपूर दुसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्र बारा पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्राच्या पदकांमध्ये ३ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्य पदकांचा समावेश असून, कर्नाटकानं सहा सुवर्ण, दोन रौप्य तर एक कांस्य पदक पटकावलं आहे. मणिपूरच्या खात्यात चार सुवर्ण आणि चार रौप्य पदकांचा समावेश आहे.

**पंतप्रधान आवास**

पंतप्रधान आवास योजनेंतर्गत, सर्व घरकुल लाभार्थ्यांना आपल्या हक्काचं घर मिळवून देण्याच्या दृष्टीनं, यंत्रणेनं काम करावं, यातही जमीन नसलेल्या बेघरांना घरकुल योजनेंतर्गत प्राधान्यानं लाभ द्यावा अशा सूचना, ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या आहेत. काल मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्याला वीस लाख घरकुल निर्मितीचं उद्दिष्ट मिळाल्याचं सांगत, सर्व पात्र लाभार्थ्यांच्या घरकुलांना मान्यता देऊन घरकुल बांधकाम तत्परतेनं सुरू करावं असे निर्देश त्यांनी दिले.

**कृषि प्रदर्शन**

कृषि विभाग भंडारा, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अर्थात आत्मा आणि भंडारा कृषि संलग्न विभाग यांच्या संयुक्त विद्यमानं दोन ते पाच फेब्रुवारी २०२५ या कालावधीत, मौजा पिंपळगाव/सडक, तालुका लाखनी, जिल्हा भंडारा इथं भव्य कृषि विकास परिषद, कृषि प्रदर्शन तसंच जिल्हा पशु संर्वधन विभागामार्फत पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. पिंपळगाव सडक इथल्या शंकरपटाच्या शताब्दी महोत्सवा निमित्त सदर कृषि विकास परीषद आणि कृषि प्रदर्शनाचं

आयोजन करण्यात आलं आहे. या कृषि प्रदर्शनाचं उद्घाटन दोन फेब्रुवारी रोजी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते होणार आहे.

**महाकुंभ**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ नगरीत गर्दीच्या नियोजनासाठी राज्यसरकारनं वाहनांना प्रवेशबंदीचा कालावधी येत्या चार फेब्रुवारीपर्यंत वाढवला आहे. दरम्यान संगमस्थळावर काल झालेल्या चेंगराचेगरीतल्या मृतांची संख्या आता ३० झाली आहे आणि ६० जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. जखमींना मेला रुग्णालयांत दाखल करण्यात आलं आहे. सुरक्षा यंत्रणेचा आढावा घेण्यासाठी उत्तरप्रदेशचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांनी आज प्रयागराजचा दौरा केला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले असून, त्याकरता तीन सदस्यीय आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

**महसूल**

राज्यातील महसूल यंत्रणा लोकाभिमुख करण्यासाठी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, थेट परिपत्रक जारी करून, जिल्हाधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा आणि उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी दोनवेळा आपल्या क्षेत्रात दौरा करून, आपल्या विभागातील शासकीय ध्येयधोरणे आणि योजना जनतेपर्यंत पोहोचतात की नाही याचा वस्तुनिष्ठ अहवाल द्यावा असं म्हटलं आहे.

*****